राज्यस्तरीय लेखा समिती
कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

क्रमांक सगृयो-२०२५/प्र.क्र.११३/१४-स

नवीन प्रशासकीय भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- १४ जुलै २०२६

वाचा :-

१) कृषी व सहकार विभाग, शासन निर्णय क्र. :- No.WFC/२७७०/८८१७/C-५, सचिवालय विस्तार, मुंबई-३२, दि.३०.०१.१९७१

२) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. सआ-१५/संवका/राज्यस्तरीय लेखा समिती/३६२/२०२६ दि.०४.०५.२०२६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये, सर्व सहकारी संस्थांचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण विहित कालावधीत पूर्ण करून घेणेबाबत तरतूद आहे. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षा अहवालातील अनियमितता, त्रुटी व दोषनिश्चिती करुन, त्याची दुरूस्ती व पुनरावलोकन करणेसाठी, विधीमंडळाच्या लोकलेखा समितीच्या धर्तीवर, राज्य स्तरीय लेखा समितीची निर्मिती करण्यात आलेली आहे. तत्कालीन कृषि व सहकार विभागाच्या संदर्भाधीन दि.३०.०१.१९७१ च्या शासन निर्णयान्वये, राज्यस्तरीय लेखा समिती गठीत करण्यात आलेली असून, समितीचे पदाधिकारी, त्यांचे अधिकार/कर्तव्ये तसेच समितीची कार्यकक्षा व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदी हया सहकारी संस्थांची तत्कालीन परिस्थिती, आर्थिक व्यवहारांचे स्वरुप व वित्तिय मर्यादा विचारात घेऊन निर्धारित करण्यात आल्या होत्या. मात्र सहकार क्षेत्रातील वाढती आर्थिक उलाढाल, बदललेले प्रशासकीय व लेखापरिक्षण विषयक निकष आणि राज्यातील शहरी व ग्रामीण नागरिक यांचे सहकार चळवळीवरील वाढलेले अवलंबित्व विचारात घेता, सभासदांचे व ठेवीदारांचे आर्थिक व सामाजिक हित सुरक्षित राखणेसाठी, सदर शासन निर्णयात कालानुरुप सुधारणा करणे आवश्यक असल्याचे, शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव राज्यस्तरीय लेखा समितीसंदर्भातील दि.३०.०१.१९७१ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन, सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

राज्यस्तरीय लेखा समितीच्या स्थापना व कार्यपध्दतीसंदर्भात तत्कालीन कृषि व सहकार विभागाचा दि.३०.०१.१९७१ रोजीचा शासन निर्णय व त्यानुसार निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश/सूचना या शासन निर्णयाव्दारे अधिक्रमित करण्यात येत असून, राज्यस्तरीय लेखा समितीसंबंधीच्या सुधारित तरतुदी पुढीलप्रमाणे लागू करण्यात येत आहेत.

सहकारी चळवळीतील महत्त्वाच्या तसेच मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षण संबंधित बाबींवर प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने, सदर संस्थांवर राज्यस्तरीय लेखा समितीचे नियंत्रण राहील.

राज्यस्तरीय लेखा समितीची रचना, कार्यकक्षा, अधिकार, कर्तव्ये व कार्यपध्दती याबाबत पुढीलप्रमाणे तरतूदी विहित करण्यात येत आहेत -

१. **राज्यस्तरीय लेखा समितीची संरचना -**

राज्यस्तरीय लेखा समितीमध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी असतील.

१.अध्यक्ष - १

२.सदस्य - २

३. सदस्य सचिव - १ (अपर निबंधक/सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण))

अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती शासन स्तरावर नामनिर्देशनाने करण्यात येईल.

२. **राज्यस्तरीय लेखा समितीचा कार्यकाळ -**

- राज्यस्तरीय लेखा समितीवरील अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात येईल.
- नियुक्तीची मुदत संपल्यानंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
- सदर पदांवरील नियुक्त्या मुदतपूर्व रद्द करणे/संपुष्टात आणणे अथवा त्यांस मुदतवाढ देणे याबाबतचे अधिकार शासनास राहतील.

३. **राज्यस्तरीय लेखा समितीवरील अध्यक्ष व सदस्य पदावरील पात्रता -**

(अ) अध्यक्ष पदासाठी पात्रता -

खालीलपैकी किमान एक पात्रता आवश्यक राहील:-

१. सहकार, ग्रामीण विकास किंवा कृषी क्षेत्रातील किमान १० वर्षांचा अनुभव.

२. कायदा, लेखांकन किंवा सहकार क्षेत्रातील व्यवस्थापकीय पातळीवरील किमान १० वर्षांचा अनुभव

(ब) सदस्य पदासाठी पात्रता -

खालीलपैकी किमान एक पात्रता आवश्यक राहील:-

१. सहकार, ग्रामीण विकास किंवा कृषी क्षेत्रातील किमान १० वर्षांचा अनुभव.

२. कायदा, लेखांकन किंवा सहकार क्षेत्रातील व्यवस्थापकीय पातळीवरील किमान ५ वर्षांचा अनुभव

४. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वृंद -

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.०५/०५/२०११ च्या आकृतिबंधानुसार, राज्यस्तरीय लेखा समितीस सहाय्य करण्यासाठी सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) या पदासह १३ पदे मंजूर राहतील. विभागाचा आकृतिबंध वेळोवेळी सुधारित झाल्यास, राज्यस्तरीय लेखा समितीसाठी आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचारीवृंद उपलब्ध राहील.

५. **राज्यस्तरीय लेखा समितीची कार्यकक्षा** -

राज्यस्तरीय लेखा समितीची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी राहील. समितीच्या कार्यकक्षेमध्ये पुढील सहकारी संस्थांचा समावेश असेल. तसेच शासन वेळोवेळी अधिसूचित करील अशा इतर सहकारी संस्थांचा समावेश करण्यात येईल.

१. राज्यस्तरीय शिखर संस्था

२. सहकारी साखर कारखाने

३. सहकारी सूतगिरण्या

४. रु. २५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक वसूल भागभांडवल अथवा रु.२५ कोटी किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या ठेवी असणा-या विविध वित्तीय सहकारी संस्था

५. रु. २५ लाख किंवा त्यापेक्षा अधिक वसूल भागभांडवल असलेल्या इतर सहकारी संस्था

६. राज्यस्तरीय लेखा समितीची कर्तव्ये -

१. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल,विशेष अहवाल व विनिर्दिष्ट अहवालांची छाननी करणे.

२. लेखापरीक्षणातील दोष व त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

३. लेखापरीक्षण अहवालांचे पुनर्विलोकन करुन शिफारशींवरील कार्यवाहीचा आढावा घेणे.

४. लेखापरीक्षण अहवाल, विशेष अहवाल किंवा संस्थांकडून प्राप्त अन्य अहवालांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार निबंधकांना सल्ला व शिफारशी करणे.

लेखापरीक्षण अहवालाच्या पुनर्विलोकनानंतर संस्थेप्रती खालील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे :-

१. लेखापरीक्षण अहवालामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटी, दोष व अनियमितता यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक सुधारात्मक उपाययोजना सुचविणे.
२. संस्थेकडील निधीचा वापर संबंधित अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींनुसार योग्य व उद्देशपूर्ण पद्धतीने होण्यासाठी मार्गदर्शन करणे.
३. संस्थेने वितरित केलेल्या निधी, कर्जे अथवा आगाऊ रकमेची वसूली विहित मुदतीत व नियमानुसार होण्याबाबत आवश्यक सूचना करणे.
४. संस्थेच्या मालमत्ता, निधी व इतर संसाधनांचा वापर संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीस अनुसरून व उपविधीतील तरतुदींप्रमाणे होत असल्याची खात्री करणे.
५. संस्थेच्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवण्यात येत असून अनावश्यक, अवाजवी अथवा नियमबाह्य खर्च होत नसल्याची शहानिशा करणे.
६. संस्थेच्या एकूण प्रशासकीय, आर्थिक व कार्यात्मक कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे.
७. संस्थेच्या कार्यक्षमता, पारदर्शकता व उत्तरदायित्वामध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सूचना करणे.
८. संस्थेमध्ये अपहार, गैरव्यवहार, आर्थिक अनियमितता अथवा नियमभंगाच्या घटना होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर तात्काळ नियंत्रण आणण्यासाठी विशेष लक्ष देणे.
९. संस्थेचे सभासद, ठेवीदार, गुंतवणूकदार तसेच ग्रामीण व शहरी नागरिकांचे आर्थिक व सामाजिक हित सुरक्षित राहील यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत मार्गदर्शन करणे.

७. **<u>राज्यस्तरीय लेखा समितीचे अधिकार</u>** -

राज्यस्तरीय लेखा समितीचे अधिकार तिच्या कार्यकक्षेतील संस्थांपुरते मर्यादित राहतील. समितीस मूलत: खालील अधिकार राहतील-

१. सहकारी संस्थांना वैधानिक लेखा परिक्षण अहवाल, समितीस प्रतिवर्षी सादर करणे बंधनकारक करणे व त्यानुषंगाने संबंधित संस्थांकडून आवश्यक ते अभिलेख, माहिती व कागदपत्रे मागवणे .

२. लेखापरीक्षण अहवालाच्या पुनर्विलोकनाअंती निष्पन्न दोष, त्रुटी, अनियमितता व दोषांची वारंवारता यावर वेळीच उपाययोजना करणेसाठी संस्थेच्या प्रतिनिधींना व संबंधित लेखापरीक्षकास सुनावणीची संधी देणे.

३. संस्थांच्या लेखापरीक्षा अहवालांची सखोल तपासणी व छाननी करुन, आक्षेपांच्या पुर्ततेसाठी आवश्यक कार्यवाहीबाबत संस्थेस उचित शिफारशी करणे.

४. लेखापरिक्षा अहवालाच्या पुनर्विलोकनाअंती संबंधित संस्थेत अनियमितता व अपहार आढळल्यास, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईबाबत निबंधकांना उचित सल्ला देणे.

५. संस्थेच्या आर्थिक स्थितीस अनुसरुन, संस्थेने केलेल्या कामकाजाचे योग्य ते मुल्यमापन करुन, संस्था व संबंधित निबंधक यांना योग्य ते मार्गदर्शन व निर्देश देणे.

६. समितीने केलेल्या शिफारशींवर झालेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संबंधित निबंधकांकडून मागविणे.

८. **<u>राज्यस्तरीय लेखा समितीची कार्यपध्दती -</u>**

- समितीच्या कार्यकक्षेतील सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण / विशेष / विनिर्दिष्ट अहवालाची एक प्रत संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षकाने दरवर्षी सप्टेंबर अखेर समितीकडे सादर करावी.
- समिती सदस्य सचिवांनी आवश्यकतेनुसार लेखापरीक्षण / विशेष / विनिर्दिष्ट अहवालाची छाननी करावी. आवश्यकता असल्यास समिती सदस्य सचिवांनी संबंधित संस्थेकडून अधिकची माहिती / कागदपत्रे मागवावीत.
- तद्नंतर संबंधित संस्थेचा लेखापरीक्षण छाननी अहवाल समितीच्या अध्यक्षांसमोर सादर करण्यात यावा.

- अध्यक्षांच्या अनुमतीने संबंधित संस्थेस प्रत्यक्ष / ऑनलाईन पद्धतीने म्हणणे मांडण्याची संधी देऊन लेखापरीक्षण अहवालातील त्रुटीबाबत / विशेष अहवालातील मुद्द्यांबाबत दोषदुरुस्ती अहवाल तीन महिन्यात सादर करण्याबाबत सूचना / निर्देश देण्यात यावेत.
- संबंधित संस्थेने तीन महिन्यात त्रुटीपूर्तता करून दोषदुरुस्ती अहवाल सादर केल्यास, दोषदुरुस्ती अहवालाची छाननी करून दोषदुरुस्ती समाधानकारक असल्यास, सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे.
- संबंधित संस्थेने तीन महिन्यात त्रुटीपूर्तता करून दोषदुरुस्ती अहवाल सादर न केल्यास, दोषदुरुस्ती अहवालानुसार प्रत्यक्षात दोषदुरुस्ती झालेली नसल्यास किंवा गंभीर दोषांबाबत / गैरव्यवहाराबाबत संस्थेचे पदाधिकारी / संचालक / अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक असल्यास, त्याबाबत संस्था प्रकारनिहाय खालील प्राधिकरणाकडे तसा प्रस्ताव समितीने पाठवावा.
  - अ) साखर कारखाने व संबंधित शिखर संस्था - साखर आयुक्त
  - आ) सूतगिरण्या व संबंधित शिखर संस्था - वस्त्रोद्योग आयुक्त
  - इ) पणन संस्था व संबंधित शिखर संस्था - पणन संचालक
  - ई) कार्यकक्षेतील इतर संस्था व संबंधित शिखर संस्था -सहकार आयुक्त
- संबंधित प्राधिकरणाने सदर प्रस्ताव संबंधित संस्थेच्या निबंधकाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवावेत.
- संबंधित निबंधकांनी अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार, संबधिताविरुद्ध आवश्यक कारवाई कमाल ०३ महिन्यात करून तसा अहवाल उपरोक्त निर्धारित प्राधिकरणास आणि राज्यस्तरीय लेखा समितीस सादर करावा.
- संबंधित निबंधक, समितीने दिलेल्या सल्ल्याशी किंवा निर्देशाशी असहमत असतील, तर त्याची सविस्तर कारणे नमूद करुन, सदर बाब संबंधित प्राधिकरणामार्फत शासनाकडे आदेशासाठी निर्देशित करतील.
- समितीचे अध्यक्ष यांना आवश्यकतेनुसार समिती सदस्यांना विवक्षितपणे / स्वतंत्रपणे कामकाज नेमून देता येईल.

९. <u>सदस्य सचिवाची कार्ये</u> -

- राज्यस्तरीय लेखा समितीसमोर सादर करावयाच्या लेखापरीक्षा अहवालांची निवड करणे व त्यांची सखोल तपासणी व छाननी करुन त्याबाबतचे आक्षेप, दोष व त्रुटी राज्यस्तरीय लेखा समितीपुढे सादर करणे.
- समितीच्या निर्णयास अनुसरुन आवश्यक असणारे दस्त, अभिलेख व माहिती मागवणे.
- समितीच्या निर्णयांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने आवश्यक पाठपुरावा करणे.
- समितीच्या बैठकीचे आयोजन व अभिलेख व्यवस्थापन करणे.
- समितीच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल शासनास सादर करणे

१०. <u>राज्यस्तरीय लेखा समितीच्या बैठका</u> -

अध्यक्ष यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार, राज्यस्तरीय समितीची बैठक मुख्यालयात किंवा विभागनिहाय घेता येईल. प्रत्येक विभागात वर्षातून किमान एक बैठक घेणे आवश्यक राहील. बैठकीस विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था व विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) व आवश्यकतेनुसार अन्य अधिका-यांना आमंत्रित करतील.

११. <u>पर्यवेक्षीय नियंत्रण</u> -

राज्यस्तरीय लेखा समितीच्या कामकाजावर अंतिम नियंत्रण राज्य शासनाचे राहिल. समितीचे अध्यक्ष राज्यस्तरीय लेखा समितीच्या कामकाजावर पर्यवेक्षीय नियंत्रण ठेवतील. अध्यक्ष पद रिक्त असल्यास समितीतील ज्येष्ठ सदस्यास समितीचे प्रभारी अध्यक्षपद देता येईल. अपवादात्मक परिस्थितीत राज्यस्तरीय लेखा समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य पदे रिक्त राहिल्यास त्या कालावधीत राज्यस्तरीय लेखा समितीचे पर्यवेक्षकीय नियंत्रण सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे राहील.

१२. <u>राज्यस्तरीय लेखा समितीच्या कामकाजाचा आढावा</u> -

राज्यस्तरीय लेखा समितीच्या कामकाजाचा आढावा शासन स्तरावर मा. मंत्री (सहकार) / मा. राज्यमंत्री (सहकार)/ अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सहकार) यांचे स्तरावर घेण्यात येईल. तसेच समितीच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सहकार) तसेच सहकार आयुक्त व निबंधक यांचे स्तरावर घेण्यात येईल.

१३. <u>मानधन, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता</u> -

राज्यस्तरीय लेखा समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित आदेशांनुसार अनुज्ञेयतेप्रमाणे मानधन, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देय राहील. मानधन , भत्ते, सोयी सुविधा, बैठका व अनुषंगिक खर्चासाठी आवश्यक निधी समितीसाठी मंजूर असलेल्या वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२६०७१४१८०१५१९२४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VIJAY NIVRUTTI BHOSALE
Date: 2026.07.14 18:03:22 +05'30'

(विजय भोसले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा.उपमुख्यमंत्री (श्री.एकनाथ शिंदे) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा.उपमुख्यमंत्री (श्रीम.सुनेत्रा पवार) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५. मा.अध्यक्ष/ मा.सभापती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचे खाजगी सचिव
६. मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई ३२
७. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
८. मा. विधीमंडळ सदस्य (सर्व)
९. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
१०. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
११. संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४. संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५. आयुक्त, दुग्धव्यवसाय/मत्स्यव्यवसाय/पशुसंवर्धन,महा.राज्य
१६. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१८. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२१. अपर निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरिक्षण), पुणे

२१. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण)

२२. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

२३. सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था

२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२५. अध्यक्ष, मुंबई जिल्हा को.ऑप.हौ.फेडरेशन लि., मुंबई

२६.अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व कार्यासने) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

२७. निवड नस्ती / (१४-स).